महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/१७०३ /२०२३ दि. २०/१०/२०२३

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** डोंबिवली वाहतूक उपविभागाचे हद्दीत कल्याण डोंबिवली महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जुने हनुमान मंदिर, चोळेगाव, ठाकुर्ली ते बॅक ऑफ महाराष्ट्र अथवा कै. रामभाऊ चौधरी चौक, ठाकुर्ली दरम्यानचे रस्त्यावर दि. २५/१०/२०२३ ते दि. ०८/११/२०२३ पर्यंत १५ दिवस पेव्हर ब्लॉक बसविण्यात येणार आहेत. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** म्हसोबा चौक, ९० फीट रोड कडून ठाकुर्ली पूर्व स्टेशन कडे येणाऱ्या येथे सर्व प्रकारच्या वाहनांना **जुने हनुमान मंदिर, चोळेगाव, ठाकुर्ली पूर्व** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने ठाकुर्ली, चोळेगाव, हनुमान मंदिर कडून कै. फोशीबाई भोईर चौक अथवा बंदिश पॅलेस हॉटेल मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** व्ही. पी. रोड कडून ठाकुर्ली पूर्व कडे येणाऱ्या येथे सर्व प्रकारच्या वाहनांना **बॅक ऑफ महाराष्ट्र अथवा कै. रामभाऊ चौधरी चौक, ठाकुर्ली पूर्व** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने बॅक ऑफ महाराष्ट्र अथवा कै. रामभाऊ चौधरी चौक, ठाकुर्ली पूर्व येथून वळण घेवून व्ही. पी. रोड मार्गे मंजुनाथ शाळा, घरडा सर्कल मार्गे इच्छीत स्थळी जातील.

सदरची वाहतूक अधिसूचना दि. २५/१०/२०२३ रोजी सकाळी ०६:०० ते वर नमूद काम संपेपावेतो अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.

CamScanner

पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

<u>प्रत</u> :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

<u>प्रत</u> :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

<u>प्रत</u> :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग,/पोनि, कल्याण, कोळशेवाडी, डोंबिवली वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा. कल्याण–डोंबिवली च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावीत.

CamScanner